विषय - सेवानिलंबीत कर्मचाऱ्यांना जिल्हा परिषद सेवेत पुनःस्थापित करणेबाबत.
श्री.एस.डब्ल्यू.घुले,कनिष्ठ लेखाधिकारी

संदर्भ -१. महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र. निप्रआ-११२२/प्र.क्र.०९/विर्चा-२ दिनांक २२ एप्रिल,२०२५
२. मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद अहिल्यानगर यांचा निलंबन आदेश क्र. साप्रवि/आस्था-३/९५९/२०२५ दिनांक २५/०८/२०२५

जा.क्र.अर्थ/कार्या-१/आस्था-१/९७७/२०२६ अहिल्यानगर दिनांक २९/०४/२०२६

## -:आदेशः-

उपरोक्त विषयान्वये जिल्हा परिषदेचे अधिनस्त श्री. एस.डब्ल्यू.घुले,कनिष्ठ लेखाधिकारी,हे आरोग्य विभाग जिल्हा परिषद अहिल्यानगर येथे कनिष्ठ लेखाधिकारी म्हणुन कार्यरत असताना त्यांना नेमुन दिलेल्या कामकाजात अक्षम्य हलगर्जीपणा केलेने तथा कर्तव्याचे पालन न करून गैरवर्तन केलेमुळे महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (वर्तणूक) नियम १९६७ चे नियम ३ चा भंग केलेला आहे,सबब श्री. घुले यांना मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. अहिल्यानगर यांच्या संदर्भ क्र. २ मधील आदेशाद्वारे जिल्हा परिषद सेवेतून आदेशाच्या दिनांकापासून सेवानिलंबीत करणेत आलेले होते.

वरिलप्रमाणे श्री. घुले यांनी केलेल्या गैरवर्तणूकी प्रकरणी त्यांचेविरुध्द दोषारोप पत्र बजावणे प्रस्तावित आहे. संदर्भ क्रमांक १ मधील शासन निर्णयातील तरतूदीनुसार श्री. घुले यांना सेवानिलंबीत होऊन तीन महिन्यांपेक्षा अधिक कालावधी झालेला आहे.सबब श्री. एस.डब्ल्यू.घुले,कनिष्ठ लेखाधिकारी यांना संदर्भ क्र. १ मधील शासन निर्णयातील तरतूदीस अधिन राहुन तसेच त्यांचेविरुध्द होणा-या न्यायिक कार्यवाहीस व प्रस्तावित दोषारोप पत्रानुसार पुढील शिक्षेच्या कार्यवाहीस अधिन राहून पंचायत समिती संगमनेर या कार्यालयात कनिष्ठ लेखाधिकारी या पदावर पुनःस्थापित करण्यात येऊन पदस्थापना देण्यांत येत आहे.

श्री एस.डब्ल्यू.घुले,कनिष्ठ लेखाधिकारी,पंचायत समिती संगमनेर यांनी पदस्थापनेच्या ठिकाणी तात्काळ हजर व्हावे तसेच सदर आदेशाची नोंद संबंधितांच्या मुळ सेवापुस्तकांत घेणेत येऊन अहवाल सादर करावा.

सदरचा आदेश जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यांत आला असुन त्याचा संकेतांक क्र.२०२६०४२९०५००९७ असा आहे.

Digitally signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 28-04-2026 19:24:00
आनंद भंडारी(भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

श्री एस.डब्ल्यू.घुले,कनिष्ठ लेखाधिकारी,पंचायत समिती संगमनेर-द्वारा गटविकास अधिकारी, पंचायत समिती संगमनेर.

प्रत- गटविकास अधिकारी, पंचायत समिती संगमनेर

२/-श्री एस.डब्ल्यू.घुले, कनिष्ठ लेखाधिकारी, यांना सदरचा आदेश बजावणेत येऊन दिनांकित स्वाक्षरीची प्रत या कार्यालयास सादर करुन आदेशाप्रमाणे अंमलबजावणी करावी.

३/- श्री एस.डब्ल्यू.घुले,कनिष्ठ लेखाधिकारी हे पुनःस्थापित पदावर हजर झाल्यानंतर हजर अहवाल या कार्यालयास तात्काळ सादर करावा.

प्रत –जिल्हा आरोग्य अधिकारी,आरोग्य विभाग,जि. प. अहिल्यानगर

प्रत -उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.वि.) यांना माहितीस्तव सादर.